महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ २८५ /२०२४ दि. १८/११/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रात **कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत **विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चे अनुषंगाने** निवडणूक अधिकारी व कर्मचारी यांची ने–आण करणे तसेच **मतदान केंद्रावर ई.व्ही.एम. मशीन व इतर साहित्य वाटप** दि. १९/११/२०२४ रोजी सकाळी ०५:०० वा. पासुन ते दिनांक २१/११/२०२४ रोजी मतदान झाले नंतर ई.व्ही. एम. मशीन व इतर साहित्य जमा होई पर्यंत घोडबंदर रोडवर सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **'प्रवेश बंद'** करण्यात येणार आहे. तरी सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद –** | १) गुजरात कडून घोडबंदर रोडच्या दिशेने ठाणे कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **चिंचोटी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| | २) मुंबई, वसई, विरार कडून घोडबंदर रोडच्या दिशेने ठाणे कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **फाउंटन हॉटेल जवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.<br>३) घोडबंदर रोडने ठाणे कडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **गायमुख जकात नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | गुजरात, मुंबई, विरार, वसई कडून घोडबंदर रोडच्या दिशेने येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना चिंचोटी नाका येथून कामण, अंजुर फाटा, माणकोली भिवंडी मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | २) मुंबई ठाणे घोडबंदर वाहिनीवरून माजिवडा ओव्हरब्रिज वरुन घोडबंदर कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **ज्युपिटर हॉस्पिटल समोरील माजिवडा ब्रिजवरील वाय जंक्शन** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर मार्गावरुन जाणारी सर्व जड अवजड वाहने मुंबई – नाशिक वाहिनीवरील ज्युपिटर हॉस्पिटल समोरील माजिवडा ब्रिजवरील वाय जंक्शन येथून उजवीकडे वळण घेवून पुढे सरळ जावून खारेगाव टोलनाका मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ३) मुंबई ठाणे घोडबंदर वाहिनी ज्युपिटर हॉस्पिटल समोरील स्लीप रोडने गोल्डन क्रॉस, कापूरबावडी सर्कल कडून घोडबंदर कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या जड अवजड वाहनांना **ज्युपिटर हॉस्पिटल समोरील कट** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने मुंबई – नाशिक वाहिनी ज्युपिटर हॉस्पिटल समोरील माजिवडा ब्रिजवरील वाय जंक्शन येथून उजवीकडे वळण घेवून पुढे सरळ जावून खारेगाव टोलनाका मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ४) भिवंडी – कशेळी मार्गे – बाळकुम नाका येथुन कापुरबावडी सर्कल मार्गे घोडबंदरकडे जाणारी सर्व जड अवजड वाहनांना **कापुरबावडी सर्कल** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे |
| **पर्यायी मार्ग –** | सदर वाहने कापुरबावडी सर्कल येथुन डावीकडे वळण घेवुन गोल्डन डाईन जक्शंन येथुन डावीकडे वळण घेवुन स्लिप रोडने पुढे सरळ मुंबई – नाशिक महामार्गावरुन खारेगाव टोलनाका मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद –** | ५) शिळफाटा – मुंब्रा कडुन पारसिक सर्कल – गॅमन जक्शंन डावीकडे – माजीवाडा मार्गे घोडबंदर कडे जाणाऱ्या सर्व जड अवजड वाहनांना **गॅमन जक्शंन** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे |
| **पर्यायी मार्ग –** | स्दरची वाहने शिळफाटा – मुंब्रा – पारसिक सर्कल गॅमन जक्शंन मार्गे सरळ – मुंबई नाशिक वाहीनी – खारेगांव खाडी ब्रिज – मानकोली मार्गे इच्छित स्थळी जातील. |

CamScanner

सदर वाहतूक अधिसूचना दि. १९/११/२०२४ रोजी सकाळी ०५:०० वा. पासुन ते दिनांक २१/११/२०२४ रोजी मतदान झाले नंतर ई.व्ही.एम. मशीन व इतर साहित्य जमा होई पर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ—५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

**प्रत कार्यवाहीसाठी :—**
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत :— पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर.**
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे**
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत :— सपोआ वाहतूक विभाग, ठाणे, वागळे, भिवंडी व प्रभारी अधिकारी, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे,कासारवडवली, मुंब्रा, कोनगांव वाहतूक उपविभाग.**
२/— म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.